**द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**सोमवार, दिनांक २२ जून ते शुक्रवार दिनांक १० जुलै, २०२६**

**सत्र कालावधीतील कामकाजाची माहिती**

**अध्यक्ष :** पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. आता मी सत्र कालावधीतील कामकाजाची माहिती सदनासमोर ठेवतो :-

| | |
|---|---|
| एकूण बैठकींची संख्या | : १४ |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | : १२७ तास ५४ मिनिटे |
| अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ | : ५ मिनिटे |
| मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ | : २५ मिनिटे |
| रोजचे सरासरी कामकाज | : ९ तास ०८ मिनिटे |
| नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय | : २ |
| शोक प्रस्ताव | : ११ |

**तारांकित प्रश्न :**

प्राप्त प्रश्न : ९०९५

स्वीकृत प्रश्न : ४१०

उत्तरित झालेले प्रश्न : ५८

**अतारांकित प्रश्न**

प्राप्त सूचना : २१३७ स्वीकृत : निरंक ,

लेखी उत्तरीत : ५०० अतारांकित याद्या ३७ ते ४६ पटलावर ठेवण्यात आल्या.

**अल्पसूचना प्रश्न :**

प्राप्त सूचना : ७, अस्वीकृत : ७

**अल्पकालीन चर्चा :**

प्राप्त सूचना : ६ मान्य : ५

चर्चा झाली : ३ अस्विकृत : १

**लक्षवेधी सूचना :**

एकूण प्राप्त सूचना : २९९८

स्वीकृत सूचना : २९२

चर्चा झालेल्या सूचना : ६२

**नियम ९७ च्या सूचना :**

प्राप्त सूचना : १३०

मान्य : निरंक

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अध्यादेशाची संख्या : ७

अध्यादेशासंबंधी नापसंती व्यक्त करण्यासाठी आलेल्या प्रस्तावांची संख्या : ७

**<u>शासकीय विधेयके :</u>**

विधानसभा : पुर:स्थापित : २२

संमत : २१

संयुक्त समितीकडे पाठविलेल्या विधेयकांची संख्या : १

विधान परिषद : संमत : ९

**<u>अशासकीय विधेयके</u>** :

प्राप्त सूचना : २९ मान्य : ११

पुर:स्थापित: १२ विचारात घेतलेली : ०८

संमत : निरंक

**<u>नियम २९३ अन्वये प्रस्ताव :</u>**

प्राप्त सूचना : ०५ मान्य : ०५

चर्चा झाली : ०५

**<u>अर्धा तास चर्चा :</u>**

**प्रश्नाच्या उत्तरातून उद्भवलेल्या**

प्राप्त सूचना : १४३

स्वीकृत : १०६ चर्चा झाली : ४

**सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर**

प्राप्त सूचना : ३२४

मान्य सूचना : १३६

चर्चा झाली : १०

**<u>अशासकीय ठराव</u> :**

प्राप्त सूचना : २१७

मान्य : १४२

चर्चा झाली : निरंक

**अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा झाली.**

**<u>सन्माननीय सदस्यांची उपस्थिती</u> :**

जास्तीत जास्त उपस्थिती : ८४.९६ टक्के

कमीत कमी उपस्थिती : ४४.७२ टक्के

एकूण सरासरी उपस्थिती : ७५.२६ टक्के

या अधिवेशनातील उल्लेखनीय बाब म्हणजे गुरुवार, दिनांक ९ जुलै, २०२६ रोजी सभागृहाची बैठक सकाळी ९.३० वाजता सुरु झाली आणि शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२६ रोजीच्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाली त्या दिवशी एकूण एकाच दिवशी १८ तास १० मिनिटे इतके कामकाज झाले. बऱ्याच वर्षानंतर सभागृहाचे कामकाज इतक्या उशिरापर्यंत चालले आहे व सखोल चर्चा झाली.

**सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आपण सर्वांनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो. माननीय मुख्यमंत्री, दोन्ही माननीय उपमुख्यमंत्री, माननीय उपाध्यक्ष, माननीय संसदीय कार्यमंत्री, सर्व माननीय मंत्री, सर्व माननीय राज्यमंत्री, सर्व तालिका सभाध्यक्ष, माननीय मुख्य प्रतोद, प्रतोद, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी, विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सर्व सुरक्षा अधिकारी व कर्मचारी तसेच मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.**

----------